सन २०१९-२० राज्य योजनेंतर्गत महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना (२४०६-A१८५) महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकरिता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.१६८/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २८ मे, २०१९

वाचा :-

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- बांबूसा-२०१७/प्र.क्र.६८/फ-९, दि.२४.८.२०१५
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:बीयुडी-२०१९/२४१५/प्र.क्र.५८/ब-१, दि.०१.०४.२०१९
४. प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष- १/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.४९(बांबू मंडळ)/९८/२०१९-२०, दिनांक ३०.०४.२०१९

प्रस्तावना :-

सन २०१९-२० आर्थिक वर्षाकरिता महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना (२४०६-A१८५) या लेखाशिर्षाअंतर्गत ०१-वेतन रु.१५०.०० लक्ष, ०२-मजूरी रु.१४०.०० लक्ष, १३-कार्यालयीन खर्च रु.७०.०० लक्ष, १४-भाडेपट्टी व कर रु.२८.०० लक्ष, २६-जाहिरात व प्रसिध्दी रु.५६.०० लक्ष, २७-लहान बांधकामे रु.१८.०० लक्ष व २८-व्यावसायिक सेवा रु.३८.०० लक्ष असा एकूण रु.५००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करुन दिलेला आहे.

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या परिपत्रक व संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०१९ ला अनुसरुन महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१९ ला अनुसरुन मागणी क्र.सी-७, २४०६-वनीकरण व वन्यजीवन" या मुख्य लेखाशीर्षाखाली दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी सन २०१९-२० करिता ०१-वेतन रु.५०.०० लक्ष, ०२-मजूरी रु.४६.६६ लक्ष, १३-कार्यालयीन खर्च रु.२३.३३ लक्ष, १४-भाडेपट्टी व कर रु.९.३३ लक्ष, २६-जाहिरात व प्रसिध्दी रु.१८.६६ लक्ष, २७-लहान बांधकामे रु.६.०० लक्ष व २८-व्यावसायिक सेवा रु.१२.६६ लक्ष असे एकूण रु.१६६.६४ लक्ष इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली आहे.

सदर योजनेअंतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या नियतव्ययाच्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून संदर्भ क्र.४ अन्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचेकडील रु.५००.०० लक्ष रकमेचा चालू बाब प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावास संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयानुसार मंजूर व अर्थसंकल्पित झालेल्या नियतव्ययाच्या अनुषंगाने शासन मंजूरी प्रदान करुन अनुदान उपलब्ध करुन देण्यास विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यानी संदर्भ क्र.४ नुसार सादर केलेला प्रस्ताव व वित्त विभागाचे संदर्भ क्र.२ येथील परिपत्रक व संदर्भ क्र.३ चा शासन निर्णय विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना (२४०६-A१८५) या योजनेमधून महाराष्ट्र बांबू विकास मंडळ व बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांना खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार सन २०१९-२० करीता **रु.१६६.६४ लक्ष** इतका निधी वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

अ. क्र.	कार्यालयाचे नांव	बाब	१ एप्रिल,२०१९ ते ३१ जुलै, २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्याकरीता प्रस्तावित रक्कम (रु.लाखात)
१	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबु विकास मंडळ, नागपूर	०१-वेतन	५०.००
		०२-मजूरी	४६.६६
		१३- कार्यालयीन खर्च	२३.३३
		बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान, महाराष्ट्र या कंपनीचे एकवेळ अनुदानातून शिल्लक रु.१३२.४९ लक्षपैकी	४६.६५
		एकूण :-	**१६६.६४**

उपरोक्त अनुदानाचा वापर करण्याच्या दृष्टीने (२४०६-A१८५) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या खालील अटी व शर्तीचे पालन करणे संबंधितावर बंधनकारक राहील.

१. वितरीत करण्यात येत असलेला रु.४६.६५ लक्ष निधी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दिनांक २४.८.२०१८ अन्वये "बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान, महाराष्ट्र" (Bamboo Promotion Foundation, Maharashtra) या कंपनीच्या स्थापनेच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.
२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे.
३. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
४. नियंत्रक प्राक्कलन अधिकाऱ्यांनी दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या मुदतीत त्यांच्याकडे सुपुर्द केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत खर्च जास्त होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

५. नियंत्रक अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, एकूण वितरीत केलेल्या/करण्यात येणाऱ्या तरतूदीपेक्षा कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
६. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
७. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.
८. वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.
९. सदर आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मंजूर व वितरीत अनुदानाच्या मर्यादेत खर्च सिमित ठेवावा.
१०. सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शिर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे.
११. संस्थेने मागील वर्षाकरिता त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र शासनास तसेच महालेखापालांना तात्काळ सादर करावे. त्याचप्रमाणे, आता वितरित करण्यात येत असलेल्या अनुदानाचे तपशिलवार देयक व विनियोग प्रमाणपत्र देखिल (Utilization Certificate) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२ नागपूर व शासनाला तातडीने सादर करावे.
१२. उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांना राहतील व त्याकरीता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.
१३. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.
१४. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांची राहील.
१५. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

१६.सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ चे परिपत्रकातील अटींची व महसूल व वन विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

१७.सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक मागणी क्र.सी-७, ०१-वनिकरण प्रधान शिर्ष- २४०६, वनिकरण व वन्यजीवन, १०५ वनोत्पादने, (०१) शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन, (०१) (०८) महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना (२४०६ A१८५) या लेखा शिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यांत यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२८१४२५२१९६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.05.28 14:32:30 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अध्यक्ष, महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान, मुंबई
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर.
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. सह सचिव/उपसचिव,वित्त विभाग (अर्थ-३)/(व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
७. उप सचिव, नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
८. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)